पार्श्वभूमी
गंमत भंडारी
दिनांक १ जानेवारी २०१९ मंगळवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.no. MA

# शासनाच्या योजना ग्रामस्तरावर नेण्याचा रा.सो.यो.राजमार्ग–विजयसिंह गोलेकर

खर्डा दि.३१(प्रतिनिधी):- श्री छत्रपती शिक्षण व आरोगय प्रसारक मंडळाच्या श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व श्री.संत गजानन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मोहरी, ता.जामखेड येथे दि.२४ ते ३० डिसेंबर दरम्यान पार पडत आहे.

या शिबीराचे उद्घाटन तालुका कृषी अधिकारी सुधीर शिंदे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्नि पंचायत समिती सदस्य विजयसिंह गोलेकर यांनी भूषविले. आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना विजयसिंह गोलेकर यांनी शासनाच्या योजना ग्रामस्तरावर पोहचवण्यसाठी राष्ट्रीय सेवा योजना हा राजमार्ग असल्याचे प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरातून सामाजिक बांधीलकीचे बाळकडु युवकांना मिळते या शब्दांत राष्ट्रीय सेवा योजनेचे कौतुक केले.

या शिबीरामध्ये स्वच्छ भारत जनजागृती, वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन, व्यसनमुक्ती, स्त्री-भ्रुण हत्या जनजागृती, गावातील सांडपाण्याचे योगय व्यवस्थापन इ.विषयी कार्यक्रम हाती घेतले जाणार आहेत.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव , डॉ.महेश गोलेकर, मोहरी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एस.आर.घोडके, सरपंच दत्तू ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबीराचे उत्कृष्ट नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.भारत मेंगडे व प्रा.शेख मोहसीन यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.राजू म्हेत्रे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा.शेख मोहसीन यांनी केले.

पुणे । मुंबई । कोल्हापूर । नाशिक । औरंगाबाद । सोलापूर । नागपूर । सातारा । जळगाव । नांदेड । अकोला येथून प्रसिद्ध

SakalNews

सकाळ



**संयमी बनले : तापसी**

प्रीमियर बॅडमिंटन लीगमुळे संयम, सहनशीलतेचे महत्त्व पटले, अशी भावना अभिनेत्री तापसी पन्नू हिने व्यक्त केली.

साप्ताहिक १०

पुणे, ★ बुधवार, २ जानेवारी २०१९

# शाश्वत ग्रामविकास युवकांच्या जडणघडणीवर अवलंबून : पवार

**खर्डा, ता. १ :** शाश्वत ग्रामविकास युवकांच्या जडणघडणीवर अवलंबून आहे, असे मत पोलिस निरीक्षक पवार यांनी केले.

येथील श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व श्री संत गजानन महाविद्यालयाच्या वतीने मोहरी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार समारोपप्रसंगी वरील उद्‌गार काढले.

पवार म्हणाले, "बलशाली राष्ट्राचा पाया उभारणीसाठी शाश्वत ग्रामविकास होणे गरजेचे आहे. युवकांची शारीरिक, मानसिक जडणघडण चांगली असली पाहिजे, हे संस्कार राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातूनच होऊ शकतात."

माजी पंचायत समिती सदस्य विजय गोलेकर यांनी या माध्यमातून ग्रामीण भागाशी विद्यार्थ्यांची नाळ जोडली जाऊ शकते, असे सांगितले. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव महेश गोलेकर होते. या शिबिरामध्ये स्वच्छ भारत अभियान जनजागृती, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, निकोप नेतृत्वविकास, व्यसनमुक्ती आदी उपक्रम राबविण्यात आले. महिलांच्या आरोग्यासाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिर घेण्यात आले.

शिबिराचे अहवालवाचन कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक मोहसीन शेख यांनी केले. आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. भारत मेंगडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्राध्यापक शिवानंद जाधव यांनी केले. सरपंच ठोंबरे, प्राचार्य डॉक्टर मोहन गुळवे, लक्ष्मण घोडके उपस्थित होते. कार्यक्रमासाठी राजू मेहत्रे, कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले.

झुंजार नेता

महाराष्ट्र ■ गुरुवार दि.3 जानेवारी २०१९ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 201

# शाश्वत ग्रामविकास युवकांच्या जडणघडणीवर अवलंबुन – पोलीस निरीक्षक पवार

खर्डा, दि.२ (प्रतिनिधी) :- श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय खर्डा व श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मौजे मोहरी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार समारोप प्रसंगी वरील उदगार काढले. यापुढे बोलतांना त्यांनी बलशाली राष्ट्राचा पाया उभारण्यासाठी शाश्वत ग्रामविकास होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी या योजनेचा केंद्रबिंदु असणाऱ्या युवकांची शारिरीक, मानसिक जडणघडण चांगली असली पाहिजे व हे संस्कार रासेयोच्या माध्यमातुनच होवु शकतात असे सांगितले. तसेच माजी पंचायत समिती सदस्य मा. विजयसिंह [illegible] माध्यमातुन युवकांची नाळ ग्रामीण भागाशी जोडली जावु शकते असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर हे होते.

रासेयोचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दि. २४ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०१८ या कालावधीत मौजे मोहरी, ता. जामखेड येथे संपन्न झाले. या शिबीरामध्ये स्वच्छ भारत अभियान जनजागृती, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, स्त्रीभृणहत्या जनजागृती, गावातील सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन, निकोप नेतृत्व विकास, व्यसनमुक्ती आदि उपक्रम प्रभावीपणें राबविण्यात आले तसेच महिलांच्या आरोग्यासाठी हिमोग्लोबीन तपासणी शिबीर घेण्यात आले. यासाठी गावातील महिलांनी भरभरून प्रतिसाद दिला. शिबीराचे अहवालवाचन कार्यक्रमाधिकारी प्रा. शेख मोहसीन यांनी केले तर उपस्थितांचे आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. भारत मेंगडें यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. शिवानंद जाधव यांनी केले. या प्रसंगी दोन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन गुळवे व लक्ष्मण घोडकेयांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.राजु म्हेंत्रे व वैशाली कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी सरपंच दत्तु ठोंबरे, भारत आहे तसेच ग्रामस्थ , शिबीरार्थी, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याची उपस्थिती होती.

झुंजार नेता
महाराष्ट्र ■ गुरुवार दि.३ जानेवारी २०१९ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 201

# शाश्वत ग्रामविकास युवकांच्या जडणघडणीवर अवलंबुन – पोलीस निरीक्षक पवार

खर्डा, दि.२ (प्रतिनिधी) :- श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय खर्डा व श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मौजे मोहरी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार समारोप प्रसंगी वरील उदगार काढले. यापुढे बोलतांना त्यांनी बलशाली राष्ट्राचा पाया उभारण्यासाठी शाश्वत ग्रामविकास होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी या योजनेचा केंद्रबिंदु असणाऱ्या युवकांची शारिरीक, मानसिक जडणघडण चांगली असली पाहिजे व हे संस्कार रासेयोच्या माध्यमातुनच होवु शकतात असे सांगितले. तसेच माजी पंचायत समिती सदस्य मा. विजयसिं[illegible] माध्यमातुन युवकांची नाळ ग्रामीण भागाशी जोडली जावु शकते असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर हे होते.

रासेयोचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दि. २४ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०१८ या कालावधीत मौजे मोहरी, ता. जामखेड येथे संपन्न झाले. या शिबीरामध्ये स्वच्छ भारत अभियान जनजागृती, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, स्त्रीभृणहत्या जनजागृती, गावातील सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन, निकोप नेतृत्व विकास, व्यसनमुक्ती आदि उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले तसेच महिलांच्या आरोग्यासाठी हिमोग्लोबीन तपासणी शिबीर घेण्यात आले. यासाठी गावातील महिलांनी भरभरून प्रतिसाद दिला. शिबीराचे अहवालवाचन कार्यक्रमाधिकारी प्रा. शेख मोहसीन यांनी केले तर उपस्थितांचे आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. भारत मेंगडे यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. शिवानंद जाधव यांनी केले. या प्रसंगी दोन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन गुळवे व लक्ष्मण घोडकेयांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.राजु म्हेत्रे व वैशाली कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी सरपंच दत्तु ठोंबरे, भारत आहे तसेच ग्रामस्थ , शिबीरार्थी, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे : १२+४ = १६, किंमत: ₹ ४.००

अहमदनगर, शुक्रवार, दि. ४ जानेवारी २०१९




मोहरी (ता. जामखेड) येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात श्रमदान करताना छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व संत गजानन महाविद्यालयाचे विद्यार्थी.

## मोहरी येथील श्रमसंस्कार शिबिराची सांगता

### सांडपाण्याचे व्यवस्थापन : स्वच्छ भारत अभियान जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**खर्डा :** मोहरी येथे आयोजित खर्डा येथील छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व संत गजानन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप झाला.

संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर अध्यक्षस्थानी होते. जामखेड पोलीस ठाण्याचे निरीक्षक पांडुरंग पवार, माजी पंचायत समिती सदस्य विजयसिंह गोलेकर, सरपंच दत्तू ठोंबरे, माजी सरपंच भारत आहेर प्रमुख पाहुणे होते.

आठ दिवस चाललेल्या शिबिरांमध्ये शिबिरार्थींनी स्वच्छ भारत अभियान जनजागृती, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, स्त्री भ्रुणहत्या जनजागृती, गावातील सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन, निकोप नेतृत्व विकास, व्यसनमुक्ती आदी उपक्रम राबविण्यात आले. महिलांसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिर घेण्यात आले. दोन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे, प्राचार्य लक्ष्मण घोडके, प्रा. राजू म्हेत्रे, प्रा. वैशाली कुलकर्णी यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाधिकारी प्रा. मोसिन शेख यांनी प्रास्ताविक केले. प्रा. शिवानंद जाधव यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाधिकारी डॉ.भारत मेंगडे यांनी आभार मानले.

पार्श्वभूमी

गंमत भंडारी

दिनांक १४ जानेवारी २०१९ सोमवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.no

# श्री संत गजानन महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा संपन्न

खर्डा दि.१२(प्रतिनिधी):- श्री छत्रपती शिक्षण व आरोगय प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा १० जानेवारी रोजी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. या स्नेहमिलाचे औचित्य साधून या महाविद्यलयाच्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत गत आठवणींना उजाळा देत सुख दुख:खाच्या गुजगोष्टी केल्या. या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्य करीत आहेत. या कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाप्रति असलेले प्रेम मनोगतातून व्यक्त केले. या स्नेहमितनाच्या अध्यक्षीय समारोपात संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी हे महाविद्यालया सदैव आपल्या सतकृत्यात आपल्या पाठीशी उभे राहील याची ग्वाही या विद्यार्थ्यांनी दिली. माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत महाविद्यालयाच्या पुढील प्रगतीमध्ये सहकार्य करण्याचे आश्वासन प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांना दिले. समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांनी या विद्यार्थ्यांना शुभेच्छा व्यक्त करीत पुनश्च असा स्नेह मेळावा घेण्याचे आवाहन केले कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.संजय होळंवे यांनी केले तर आभार प्रदर्शन शेख मोहसीन यांनी केले.

झुंजार नेता
बुधवार दि.३० जानेवारी २०१९ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/

# विद्यार्थिनींनी स्वकर्तृत्वावर यशाची शिखरे पादाक्रांत करावीत- पो.नि. वैशाली पेटकर

खर्डा, दि.२९ (प्रतिनिधी):- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालयात दि.२१ जाने.२०१९ रोजी निर्भय कन्या अभियान राबविण्यात आले. त्यावेळी आपल्या उद्घाटनपर मनोगतातून पोलिस उपनिरीक्षक वैशाली पेटकर यांनी वरील उद्गार काढले. मुलींनी आपल्या स्वीकृत कार्यात कष्टाने पुढे यावे, यासाठी दुसऱ्यावर अवलंबून न राहता स्वकर्तृत्वावर यशाची शिखरे पादाक्रांत करावीत असा सल्ला त्यांनी उपस्थित विद्यार्थिनींना दिला. या कार्यक्रमासाठी जामखेड परिक्षेत्राचे पोलिस उपनिरीक्षक अवतारसिंह चव्हाण यांनीही विविध कायद्यांची विद्यार्थिनींना माहिती देत पोलिस विभाग राबवत असलेल्या विविध उपायोजनांची माहिती दिली. प्रमुख पाहुण्या खर्डा शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती ज्योतीताई गोलेकर यांनीही आपल्या मनोगतातून विविध क्षेत्रातील संधी विद्यार्थिनींना आज खूल्या झाल्या आहेत त्यासाठी परंपरेची बंधने झुगारून सर्वच क्षेत्रात निर्भयपणे कारकिर्द घडवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात प्रमुख पाहुण्या सौ.सविताताई गोलेकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जिवन चरित्रावरील कविता सादर करत आपले मनोगत व्यक्त केले. खर्डा ग्रामपंचायत सदस्य सौ.वैशाली थोरात यांनीही विद्यार्थिनींना स्थानिक स्वराज्य संस्थेचा कारभार समजून घ्यावा व आपले स्वत:चे मत बनवावे असा मोलाचा सल्ला दिला. याप्रसंगी सौ.उर्मिला खेडकर यांनी विविध उदाहरणातून स्त्री आता अबला नसून सबला झाल्याचे प्रतिपादन केले. अध्यक्षय समारोपात प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांनी महाविद्यालयात मुलींची सुरक्षतेसाठी तक्रार पेटी तयार केल्याचे सांगून त्याचा उपयोग घेण्याचे आवाहन विद्यार्थिनींना केले. या कार्यक्रमासाठी संस्थेच्या संचालिका सौ.चंदाताई गोलेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.धनंजय जवळेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.शेख मोहसीन यांनी केले.

# झुंजार नेता

राष्ट्र ■ सोमवार दि.४ फेब्रुवारी २०१९ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 201


## श्री छत्रपती शिक्षण संकुलात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

खर्डा, दि.३ (प्रतिनिधी) :- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व सेंट मदर तेरेसा किलबील इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. ३० रोजी उत्साहात संपन्न झाले. या स्नेह संमेलनाचे उद्घाटन सिताराम गडाचे मठाधिपती महालिंग महाराज नगरे यांच्या शुभहस्ते झाले. स्नेह संमेलनानिमित्त विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या कलागुणांतुन चैतन्याचा मळा फुलविला. मुकनाट्य, लावणी, सोलोनृत्य, भारूड, सिनेगितांचे गायन अशा बहारदार कार्यक्रमाची रेलचेल यानिमित्त पहावयास मिळाली. या स्नेह संमेलनात वर्षभरात विविध क्षेत्रात नैपुण्य मिळावलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष मा. विजयसिंह गोलेकर, प्राचार्य डॉ. मोहन गुळवे, संस्थेच्या सन्माननीय संचालीका चंदाताई गोलेकर, सितारामगडाचे मठाधिपती महालिंग महाराज नगरे यांच्या हस्ते पारितोषीक व प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या सर्व विभागांचा प्रगती अहवाल मा. प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी सादर केला. या सांस्कृतिक कार्यक्रमाला खर्डा गावातील ग्रामस्थांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन मा. चंद्रकांत गोलेकर; पत्रकार संतोष थोरात, संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती.

पार्श्वभूमी

संपादक: गंमत भंडारी

दिनांक ५ फेब्रुवारी २०१९ मंगळवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.n

# श्री छत्रपती शिक्षण संकुलात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

खर्डा दि.०४(प्रतिनिधी):- श्री छत्रपती शिक्षण व आरोगय प्रासारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय श्री छत्रपती क. महाविद्यालय व सेंटमदर तेरेसा किलबील इंग्लीश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. ३० रोजी उत्साहात संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सितारामगडाचे मठाधिपती महालिंग महाराज नगरे यांच्या शुभ हस्ते झाले. स्नेसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या कलागुणांतून चैतन्याचा मळा फुलविला, मूकनाट्य, लावणी, सोलोनृत्य, भारूड, सिनेगीतांचे गायन अशा बहारदार कार्यक्रमांची रेलचेल यानिमित्त पहावयास मिळाली. या स्नेहसंपेलनात वर्षभरात विविध क्षेत्रात नैपूण्य मिळावलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे विद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष विजयसिंह गोलेकर प्राचार्य डॉ.मोहन गुळवे, संस्थेच्या सन्मानीय संचालीका सौ.चंदाताई गोलेकर, सितारामगडाचे मठाधिपती महालिंग महाराज नगरे यांच्या हस्ते पारितोषीक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.याप्रंसगी महाविद्यालयाच्या सर्व विभगांचा प्रगती अहवाल प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांनी सादर केला.

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पृष्ठे : १२+४ = १६, किंमत: ₹ ४.00
अहमदनगर, बुधवार, दि. १३ फेब्रुवारी २०१९



खर्डा येथील किलबिल स्कूल, छत्रपती महाविद्यालय व संत गजानन महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना संस्थेच्या संचालिका चंदा गोलेकर, महालिंग महाराज नागरे.

# खर्डा येथे विविध गुणदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**खर्डा :** किलबिल इंग्लिश स्कूल, श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व संत गजानन महाविद्यालय यांच्या संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले.

संस्थेच्या संचालिका चंदा गोलेकर व सीताराम गडाचे मठाधिपती महालिंग महाराज नागरे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्नेहसंमेलनाचा शुभारंभ झाला. लहानांसह मोठ्या विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा सादर केल्या. जुन्या मराठी हिंदी गाण्यावर विद्यार्थ्यांना नृत्य करुन कलागुणांचे प्रदर्शन केले. गुणवंत विद्यार्थ्यांना यावेळी पारितोषिके देण्यात आली.

यावेळी सीतारामगडाचे मठाधिपती महालिंग महाराज नगरे, प्राचार्य लक्ष्मण घोडके, प्राचार्य किरण खेडकर, प्राचार्य डॉ. मोहन गुळवे, प्रा. वैशाली कुलकर्णी, प्रा. अजिनाथ खेडकर, माजी पंचायत समिती सदस्य विजयसिंह गोलेकर, प्रा.ओंकार खिस्ते, प्रा. धनंजय जवळेकर, प्रा. राजू म्हेत्रे यांच्यासह पालक उपस्थित होते.

प्रा. शिवानंद जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. भारत मेंगडे यांनी आभार मानले.

महाराष्ट्राचा मानबिंदू

# लोकमत

पृष्ठे : १२+४ = १६, किंमत: ₹ ४.००

अहमदनगर, शुक्रवार, दि. १५ फेब्रुवारी २०१९


## करिअरविषयक संधीची माहिती महत्त्वाची

### संध्या सोनवणे : गजानन महाविद्यालयात विद्यार्थ्यांशी संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**खर्डा :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरविषयक संधींची माहिती नसल्याने ते ध्येय निश्चित न करता मार्गक्रमण करतात. त्यामुळे गुणवत्ता व बुद्धिमत्ता असतानाही त्यांची फसगत होते. त्यासाठी करिअरविषयक संधीची माहिती मिळविणे महत्त्वाचे असते, असे प्रतिपादन स्टुडंटस् हेल्पिंग हँड या सामाजिक संस्थेच्या सचिव तथा राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा संध्या सोनवणे यांनी केले.

खर्डा (ता. जामखेड) येथील संत गजानन महाविद्यालय व खर्डा इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना करिअरबाबत मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष विजयसिंह गोलेकर अध्यक्षस्थानी होते.

सोनवणे म्हणाल्या, जामखेडसारख्या मागास व ग्रामीण भागात प्रथमच करिअरविषयक अशा कार्यक्रमाचे नियोजन केले आहे. विद्यार्थी व युवकांना या माध्यमातून भविष्यातील शिक्षण, रोजगार व नोकरीची संधी,व्यवसाय मार्गदर्शन, करिअर विषयक माहिती मिळणार आहे. जामखेड सारख्या सततच्या दुष्काळी व अवर्षण प्रवण तालुक्यात रोजगारासह शैक्षणिक सुविधांचीही वानवा असताना असे कार्यक्रम विद्यार्थी व युवकांना दिशादर्शक ठरतील यात शंकाच नाही. यावेळी प्राचार्य लक्ष्मण घोडके, मुख्याध्यापक अशोक रुद्रके, पर्यवेक्षक रमेश पाटील, प्रा. शिवानंद जाधव यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पृष्ठे : १०+४+४ =१८, किंमत: ₹ ४.००
अहमदनगर, मंगळवार, दि. २६ फेब्रुवारी २०१९

...ANAN MAHAVIDYALAYA
...BRARY
...OK NO.
...DA

## प्रकट दिनानिमित्त खर्डा येथे रक्तदान

खर्डा : संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त संत गजानन महाविद्यालय, छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन सरपंच संजय गोपाळघरे व सेवा संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत गोलेकर यांच्याहस्ते झाले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य विजय गोलेकर, माजी सरपंच शिवकुमार गुळवे, माजी उपसरपंच भागवत सुरवसे, डॉ. बिपीनचंद्र लांड यांची उपस्थिती होती. शिबिरासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा.मोसिन शेख, प्रा. डॉ. भारत मेंगडे, प्राचार्य मोहन गुळवे, प्राचार्य लक्ष्मण घोडके, प्रा. श्रीकांत तनपुरे, प्रा. शिवानंदन जाधव, प्रा. धनंजय जवळेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. सीतारामगडाचे मठाधिपती महालिंग महाराज नगरे यांचे काल्याचे कीर्तन होऊन भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी आभार मानले.

Prog. Officer Principal
Shri Sant Gajanan Mahavidyalaya(N.S.S.)

सायं. दै.

महाराष्ट्र

# सूर्योदय

Email :daily.suryoday@gmail.com

संपादक : गंगाधर काळकुटे

www.esuryoday.in

दि.२५ फेब्रुवारी २०१९ पोस्टल दि.२६ फेब्रुवारी २०१९ RNI No.MAHMAR/2014/54581 पो.र.नं. L/Beed/33/20


## श्री.संत गजानन महाविद्यालयाच्यावतीने रक्तदान शिबीर संपन्न

बीड (प्रतिनिधी):– श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा संचलीत श्री.संत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजने मार्फत श्रीसंत गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त संजय गोपाळघरे व कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष चद्रकांत गोलेकर यांच्या हस्ते संपन्न झाले. या रक्तदान शिबीरासाठी स्वामी नरेंद्र महाराज भक्तमंडळाने भरभरून प्रतिसाद दिला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी रक्तदानाचे महत्व विशद केले. या प्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष विजसंसिह गोलेकर, रा. कॉ. पार्टीचे शहर अध्यक्ष संतोष लष्करे, शिवकुमार गुळवे, संतोष थोरात, यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यायातील सुमारे २१ कर्मचाऱ्यांनी रक्तदान करुन कार्यक्रमाची यशस्विरिता केली. या रक्तदान शिबीराचे यशस्वी आयोजन राष्टीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. मोहसीन शेख व डॉ. भारत मेंगडे यांनी केले.

Prog. Officer

Principal

Shri Sant Gajanan Mahavidyalaya(N.S.S.)

बीडचा

# लोकप्रश्न

epaper : www.lokprashna.com

अंक ४५ मंगळवार, दि.५ मार्च २०१९ Reg.No.L / Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHMA

## कार्यवाहीच्या बडग्याशिवाय मराठीचा वापर सर्वत्र होणार नाही -डॉ. गोलेकर

खर्डा । वार्ताहर

श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालयात कवि कुसूमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले. या गौरव दिनाचे अध्यक्षस्थान संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी भुषविले. प्रमुख पाहुणे प्राचार्य विक्रम कांबळे यांनी म्हणी, वाक्यप्रचाराच्या माध्यमातून मराठी भाषेच्या वैविध्यतेचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. मराठी भाषेचा वापर करूत असताना अनावश्यक इंग्रजी शब्दांचा वापर टाळण्याचा सल्ला त्यांनी उपस्थितांना दिला. कवितांच्या सादरीकरणातून त्यांनी मराठी भाषेचे वैभव विद्यार्थ्यांसमोर खुले केले. आपल्या अध्यक्षीय समारोपात डॉ. महेश गोलेकर यांनी मराठी भाषेतून अधिकाधिक संशोधन व्हावे व मराठी ही ज्ञानभाषा व्हावी अशी अपेक्षा विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केली.

र । कोल्हापूर । अकोला । गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित । आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ४७००१/१९८८ । वर्ष : ३२ अंक : १९६ www.facebook.com/l

महाराष्ट्राचा मानबिंदू

लोकमत

अहमदनगर, सोमवार, दि. ४ मार्च २०१९

पृष्ठे : १२+४ = १६, किंमत: ₹ ४.००

# ऐतिहासिक खर्डा गावातील वीरगळ उपेक्षित

संतोष थोरात।
लोकमत न्यूज नेटवर्क

खर्डा : रणांगणावर वीरमरण येणे हे भारतीय लोकजीवनात गौरवास्पद मानले गेले आहे. असे वीरमरण प्राप्त झालेल्या वीरांची स्मारके वीरगळाच्या रूपाने काही ऐतिहासिकदृष्ट्या प्रसिद्ध गावांमध्ये उभारलेले आपल्याला पाहायला मिळते. ऐतिहासिक खर्डा गावात असे बरेच वीरगळ सध्या अज्ञान व देखभालीअभावी मोडकळीस आले आहेत. त्यांना तेल किंवा शेंदूर लाऊन होणाऱ्या पूजेमुळे हे वीरगळ शेवटच्या घटका मोजत आहेत.

गावात वीरगळ असणे हे त्या गावाचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करते. भूतकाळात इथे युद्ध किंवा समरप्रसंग घडला होता आणि कोणी वीर धारातीर्थी पडले, याची मूकपणाने साक्ष आज हे वीरगळ आपल्याला देत आहेत. म्हणूनच हे वीरगळ म्हणजे त्या गावांचा मोठा ठेवा मानला जातो. वीरगळ म्हणजे काय, ते कसे असतात? मुळात हा शब्द कानडी भाषेमध्ये कल्लू म्हणजे दगड. वीराचा दगड तो वीरकल्लू, त्यावरुन वीरगळ हा शब्द मराठीत प्रचलित झाला. स्थानिक लोक तर वीर गळून पडला म्हणून त्याचे स्मारक ते वीरगळ, असा अगदी सुटसुटीत अर्थ सांगतात. इंग्रजीतही त्याला 'हिरो स्टोन' असे म्हटले जाते. एका पाषाणाच्या शिळेवर काही विशिष्ट शिल्पांकन करून तो पाषाणस्तंभ उभा करून त्या वीराचे स्मरण करणे म्हणजेच वीरगळ. आपल्या लाडक्या योद्ध्याचे स्मारक असलेले आकाराने सामान्यत: अडीच ते तीन फूट उंचीच्या शिळेवर एकावर एक असे ३ किंवा ४ चौकोन खोदून त्यात या वीरांच्या कथेचे अंकन केलेले असते.

सर्वात खाली तो वीर मृत्यूमुखी पडलेला दाखवितात. त्याच्या वरच्या थरात त्याचे युद्ध चाललेले दाखविले जाते. त्याच्या वर तो मृत झाला असून त्याला अप्सरा स्वर्गात घेऊन जात असल्याचे कल्पिले आहे. सर्वात वरच्या चौकोनात तो शिवमय झाला असे दाखवण्यासाठी तो शिवपिंडाची पूजा करताना दाखविण्याची प्रथा आहे. यात अजून वर त्या पाषाणाच्या दोन बाजूंना चंद्र-सूर्य दाखविलेले असतात.

## इतिहासाचे साक्षीदार जतन करणे आवश्यक

- खर्डा गावातील शुक्रवार पेठेच्या रस्त्यावरील शनी व मारुती मंदिराबाहेर हे वीरगळ आहेत. या मंदिराच्या ओट्याच्या बांधकामासह गावातील इतर बांधकामात अजूनही पाया खोदताना असे वीरगळ बाहेर निघतात. वीरगळ इतिहासाचा थेट साक्षीदार असून त्याचे काळजीपूर्वक जतन करायला हवे.

" वीरगळ या देवता असल्याच्या गैरसमजातून त्यांची पूजाअर्चा होते. हा प्रकार अयोग्य, चुकीचा व अज्ञानातून होणारा आहे. वीरगळांचे संवर्धन होण्यासाठी पुरातत्व विभागाने त्या एकत्रित करुन खर्डा किल्ल्यात संवर्धित करून तेथे त्याविषयीचा सविस्तर माहिती फलक लावावा. त्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांना आपल्या ऐतिहासिक ठेव्याची जाणीव व माहिती होईल.

-प्रा.धनंजय जवळेकर, इतिहास संशोधक, खर्डा (ता. जामखेड)

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पृष्ठे : १०+४+४ = १८, किंमत: ₹ ४.००
अहमदनगर, मंगळवार, दि. १२ मार्च २०१९

# खर्ड्याच्या किल्ल्यात शिवप्रतिमा पूजन

## शिवप्रेमी आले एकत्र : खर्ड्याच्या लढाईला २२४ वर्षे पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**खर्डा :** मराठ्यांच्या विजयाचे प्रतीक म्हणून झालेल्या लढाईला २२४ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सोमवारी खर्डा भुईकोट किल्ल्यावर जामखेड तालुक्यासह मराठवाड्यातील शिवप्रेमी एकत्र आले होते. किल्ला दरवाजावर शिवप्रतिमेचे व ध्वजाचे नाना खंडागळे, माउली जमदाडे, संतोष शिंदे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

यावेळी बबलू निकम, महेश भोसले, प्रमोद गोलेकर, संकेत सातपुते, सोनाजी सुरवसे, रुद्र हुंबे, जयदीप पिंगळे, आकाश कोरे, ऋषिकेश क्षीरसागर, आकाश कोकिळ, अनिकेत सातपुते, रितेश भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिमा पूजन झाल्यावर दुचाकी फेरी काढण्यात आली.

निजाम व मराठ्यांमध्ये ११ मार्च १७९५ रोजी खर्डा येथील रणटेकडीवर झालेल्या युद्धात मराठ्यांनी निजामाच्या सैन्याचा सपशेल पराभव केला. सर्व मराठे सरदार एकत्र येऊन लढलेली ही मराठ्यांची शेवटची लढाई होती. पराभवानंतर निजामाने खर्डा किल्ल्याचा आश्रय घेऊन ३ कोटी रुपये युद्ध खर्च मराठ्यांना देण्याचे कबूल केले. या युद्धात धारातिर्थी पडलेल्या शूर मराठा वीरांना अभिवादन करण्यासाठी सोमवारी खर्डा परिसरातील शिवप्रेमी एकत्र आले. त्यांनी रणटेकडीवर भगव्या ध्वजाचे पूजन करुन युध्द स्मारकावर भगवा झेंडा फडकविला.

यावेळी प्रा. धनंजय जवळेकर यांनी खर्डा लढाईचे वीररसपूर्ण व्याख्यान उपस्थितांसमोर दिले. रावसाहेब जाधव यांच्या अकादमीतील विद्यार्थ्यांनी चित्तथरारक शारीरिक कसरती केल्या. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे तालुकाध्यक्ष पांडुरंग भोसले यांनी शौर्यदिनाचे महत्व विशद केले. तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाची जाणीव ठेवण्याचे आवाहन केले. यावेळी मुला-मुलींनी दांडपट्टा, लाठी काठी, तलवारबाजीची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी बंटी पाटील, भाऊ पोटफोडे, श्रीकांत शिकेतोड, निलेश देवकर यांच्यासह अनेक शिवप्रेमी उपस्थित होते.



खर्डा किल्ल्यावरील लढाईला २२४ वर्षे पूर्ण झाल्याप्रित्यर्थ सोमवारी शिवप्रेमी या गडावर एकत्र आले होते. त्यांनी शिवप्रतिमा व ध्वजाचे पूजन केले.

पुण्यनगरी
बुधवार,१३ मार्च २०१९

# शौर्याची गाथा असलेल्या खर्डा लढाईला २२४ वर्षे पूर्ण

## किल्ले शिवपट्टण येथे युवकांची मानवंदना : रणाटेकडीवर फडकला भगवा

**पुण्यनगरी वृत्तसंस्था / जामखेड**

मराठ्यांच्या इतिहासातील मानबिंदू आणि शौर्याची गाथा समजल्या जाणाऱ्या खर्डा येथील लढाईला सोमवार दि.११ रोजी दोनशे चोवीस वर्षे पूर्ण झाली. निजामशाह आणि मराठ्यांच्या फौजेत झालेल्या या लढाईत अतुलनीय शौर्य दाखवित विजयाच्या इतिहासाचे सोनेरी पान लिहिले गेले. या शौर्यगाथेचे स्मरण करीत खर्डा येथील शिवपट्टण किल्ला परिसरातील रणटेकडी येथे जमलेल्या तरूणांनी व नागरिकांनी भगवा फडकवित युध्दातील शुरविरांना अभिवादन केले.



ही ऐतिहासिक लढाई ११ मार्च १७९५ रोजी झाली. मराठा सैन्याच्या या अभिमानास्पद शेवटच्या विजयाच्या गौरवशाली इतिहासाचा साक्षीदार असलेल्या खर्डा किल्ल्यास इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा भुईकोट किल्ला शिर्डी-हैद्राबाद मार्गावर खर्डा शहरालगत चांगल्या अवस्थेत उभा आहे. राज्य शासनाच्या निधीमधून आतिल बांजुच्या भिंती बाधंण्याचे काम चालु आहे. २६ जानेवारी, १५ ऑगस्ट व १ मे या दिवशी या ठिकाणी शासकीय ध्वजरोहणाचा कार्यक्रम मोठ्या दिमाखात पार पडतो. तर जवळच रणटेकडी म्हणून एक परिसर आहे. ही रणटेकडी युद्धभूमी म्हणून प्रसिद्ध आहे. या ठिकाणी तरूण मुले भगवा झेंडा लावून मानवंदना देतात. किल्ले शिवपट्टण येथील परिसरात झालेल्या त्या लढाईत धारातीर्थी पडलेला शुरविरानां मानवदंना देण्यात आली. रणसंग्रामाची माहिती जवळेकर यांनी सांगितली. सोनेगाव येथील रावसाहेब म्हणाले, मराठी शौर्याची, पराक्रमाची, बलिदानाची व विजयाची साक्ष देणारी ही रणटेकडी आहे. यावेळी नायगाव येथील युवक-युवतींनी व जामखेडच्या क्रांती मर्दानी पथकातील युवकांनी लाठी-काठी, दांडपट्टा, तलवार, भाला या युध्दकलेचे प्रात्यक्षिक दाखवले. यावेळी रणटेकडीवर जय भवानी-जय शिवराय घोषणांनी परिसर दमदमुन गेला. यावेळी श्री शिवप्रतिष्ठानचे जामखेड तालुका प्रमुख पांडुराजे भोसले, महेश भोसले, संतोष शिंदे, माउली जमदाडे, नाना खंडागळे, भाउ पोटफोडे, बंटी पाटील, दौडवाडीचे टिलेश जाधव, श्रीकांत शिकेतोड, निलेश देवकर आदींसह तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पार्श्वभूमी
संपादक : गंमत भंडारी
१ दिनांक २० मार्च २०१९ बुधवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.no

# रोजगाराभिमुख शिक्षण काळाची गरज:डॉ.महेश गोलेकर

खर्डा दि.१९(प्रतिनिधी):- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने दि.११ मार्च २०१९ रोजी कँपस इंटरव्युचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमासाठी रांजणगाव पुणे औघोगिक विकास मंडळातील हायर इलेक्ट्रोनिक्स प्रा.लिमेटेड व धूत ट्रान्समीशन कंपनीच्या वतीने मुलाखती घेण्यात आल्या. संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी शिक्षणातून रोजगारनिर्मिती व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करत विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

खर्डा सारख्या ग्रामीण भागात रोजगाराभिमुख शिक्षण देणाऱ्या या संस्थेने दरवर्षी नियमीतपणे नोकर भरती मेळावा घेवून भागातील विद्यार्थ्यांना रोजगारच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. या कँपस इंटरव्युहचा ४७ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. यातील ३३ विद्यार्थ्यांनी विविध कंपन्यामध्ये निवड करण्यात आली. प्राचार्य डॉ.मोहन गलुले व प्राचार्य लक्ष्मण घोडके यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा व्यक्त

# पार्श्वभूमी

संपादक : गंमत भंडारी

१ दिनांक १५ जुलै २०१९ सोमवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.no


## लोकसंख्या नियंत्रनासाठी लैंगिक शिक्षण गरजेचे-प्राचार्य डॉ.गुळवे

खर्डा दि.१४(प्रतिनिधी):- श्री.छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय व छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयात भूगोल व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. त्याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने तंबाखूजन्य पदार्थ व्यसनमुक्तीसाठी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना सामुहिक शपथ घेण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.शिवानंद जाधव यांनी केले. तर अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून खर्डा इंग्लिश स्कुलचे प्राचार्य फाळके एस.डी.हे होते. प्राचार्य फाळके यांनी लोकसंख्या वाढीच्या भयावह परिणामांची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांनी बोलतांना लैंगिक शिक्षणाच्या माध्यमातून लोकसंख्या नियंत्रणासाठी लोकमत जागृत करण्याची गरज प्रतिपादन केली. सुत्रसंचालन प्रा.श्रीकांत तनपुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.नकुल खवले यांनी केले.

शनिवार । दि. २० जुलै २०१९ PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९/१९५७, वर्ष ८८, अंक : १९८ ।

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net

# व्यवसाय शिक्षणही घ्यायला पाहिजे

## रोहित पवार यांचे प्रतिपादन, खर्डा येथे शिक्षक-पालक मेळावा

खर्डा/ वार्ताहर

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अभ्यासासाठी केला पाहिजे. तसेच पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यवसाय शिक्षणही घ्यायला पाहिजे, असे प्रतिपादन पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य रोहित पवार यांनी केले.

जामखेड तालुक्यातील खर्डा येथील श्री संत गजानन महाविद्यालयात आयोजित विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळाव्यात ते बोलत होते. विजयसिंह गोलेकर अध्यक्षस्थानी होते. श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मण घोडके, उपप्राचार्य शिवानंद जाधव, डॉ. भारत मेंगडे, वैशाली कुलकर्णी, चंद्रकिशोर बारटक्के, नकुल खवले, डॉ. ओंकार खिस्ते, संतोष थोरात, दत्तराज पवार, स्थानिक स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष प्रकाश गोलेकर, डॉ. बिपीनचंद्र लाड, बाळासाहेब सुरवसे, इस्माईल शेख यावेळी उपस्थित होते.



खर्डा येथील शिक्षक-पालक मेळाव्यात रोहित पवार यांनी विद्यार्थी-पालकांशी संवाद साधला.

पवार म्हणाले, पालक आणि शिक्षकांमधील समन्वयामुळेच विद्यार्थ्यांची प्रगती होऊ शकते. विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा परंतु त्याचा गैरवापर करु नये. आई- वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून आपले ध्येय साध्य केले पाहिजे, असेही ते म्हणाले.

# झुंजार नेता

ड , महाराष्ट्र ■ शनिवार दि.२० जुलै २०१९ ■ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Be


## श्री संत गजानन महाविद्यालयात पालक मेळाव्याचे आयोजन - प्राचार्य डॉ. गुळवे

खर्डा, दि.१९ (प्रतिनिधी) :- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ संचलीत श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा ता. जामखेड येथे दि. १९/%/२०१९ रोजी विद्यार्थी पालक शिक्षक मेळाव्याचे आयोजन केलेले आहे. महाविद्यालयातील अनेक शैक्षणिक उपक्रमांपैकी पालक मेळावा हा एक उपक्रम असुन अशा मेळाव्यामुळे पालक व महाविद्यालयीन प्रशासनाचा सुसंवाद होऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाला यामुळे मदत होणार असल्याचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी स्पष्ट केले. प्रस्तुत पालक मेळाव्यासाठी सर्व पालकांनी उदंड प्रतिसाद द्यावा असे आवाहन संस्थेचे सचिव मा. डॉ. महेश गोलेकर यांनी केले. या मेळाव्याचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष मा. विजयसिंह गोलेकर असतील तर प्रमुख पाहुणे म्हणुन खर्डा गावचे सरपंच संजयआबा गोपाळघरे हे उपस्थित असतील. जिल्हा परिषद सदस्य अनिल लोखंडे उपसरपंच मा. संजय सुर्वे, पत्रकार संतोष थोरात यांची या. उपक्रमासाठी प्रमुख उपस्थिती असेल.

RNI-MAHMAR/2017/73842

ग्रामीण महाराष्ट्राचा 'बुलंद आवाज'

नांदेड
लातूर
अहमदनगर
औरंगाबाद

# आदर्श गावकरी

वर्ष : ३ , अंक : २९
पाने : ८ + ४ =१२ किंमत : ३₹

शनिवार, दि. २० जुलै २०१९, आषाढ कृ. ३, शके १९४१ adarshg__kari.com औरंगाबाद । जालना । बीड । नांदेड । लातूर । परभणी । हिंगोली । उस्मानाबाद । बिदर । अहमदनगर । सोलापूर । मुंबई । दिल्ली

## गजानन महाविद्यालयातील मेळावा उत्साहात




**खर्डा, दि. १९ (प्रतिनिधी)** - येथील श्री छत्रपती आरोग्य व शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालयात विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थी, पालक व शिक्षकांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

अध्यक्षस्थानी माजी पंचायत समिती सदस्य विजयसिंह गोलेकर होते. मेळाव्याचे उद्घाटन पुणे जिल्हा परिषद सदस्य रोहित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. पवार म्हणाले, पालक आणि शिक्षकांमध्ये जो समन्वय साधला जात आहे, त्यामुळेच विद्यार्थ्यांची प्रगती होण्यास मदत होत आहे. विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून मोबाईल फोनचा अभ्यासासाठी वापर करावा.

स्वागत विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी केले. श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मण घोडके, उपप्राचार्य शिवानंद जाधव, डॉ. भारत मेंगडे, प्रा. वैशाली कुलकर्णी, प्रा. चंद्रकिशोर बारटक्के, प्रा. नकुल खवले, प्रा. डॉ. ओंकार खिस्ते, ग्रामपंचायत सदस्य संतोष थोरात, दत्तराज पवार, स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष प्रकाश गोलेकर, डॉ. बिपिनचंद्र लाड, बाळासाहेब सुरवसे, इस्माईल शेख उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. श्रीकांत तनपुरे यांनी केले, तर आभार प्रा. धनंजय जवळेकर यांनी केले.

झुंजार नेता

ड, महाराष्ट्र ■ शनिवार दि.२० जुलै २०१९ ■ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/

करण्यात येत आहे.

## श्री संत गजानन महाविद्यालयात पालक मेळाव्याचे आयोजन - प्राचार्य डॉ.गुळवे

खर्डा, दि.१९ (प्रतिनिधी) :- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ संचलीत श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा ता. जामखेड येथे दि. १९/%/२०१९ रोजी विद्यार्थी पालक शिक्षक मेळाव्याचे आयोजन केलेले आहे. महाविद्यालयातील अनेक शैक्षणिक उपक्रमांपैकी पालक मेळावा हा एक उपक्रम असुन अशा मेळाव्यामुळे पालक व महाविद्यालयीन प्रशासनाचा सुसंवाद होऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाला यामुळे मदत होणार असल्याचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी स्पष्ट केले. प्रस्तुत पालक मेळाव्यासाठी सर्व पालकांनी उदंड प्रतिसाद द्यावा असे आवाहन संस्थेचे सचिव मा. डॉ. महेश गोलेकर यांनी केले. या मेळाव्याचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष मा. विजयसिंह गोलेकर असतील तर प्रमुख पाहुणे म्हणुन खर्डा गावचे सरपंच संजयआबा गोपाळघरे हे उपस्थित असतील. जिल्हा परिषद सदस्य अनिल लोखंडे उपसरपंच मा. संजय सुर्वे, पत्रकार संतोष थोरात यांची या. उपक्रमासाठी प्रमुख उपस्थिती असेल.

ग्रामीण महाराष्ट्राचा 'बुलंद आवाज'
आदर्श गावकरी
RNI-MAHMAR/2017/73842
adarshgavkari.com
...री । उस्मानाबाद । बिदर । अहमदनगर । सोलापूर । मुंबई । दिल्ली
दि. ३ ऑगस्ट २०१९, श्रावण शु.३, शके १९४१
+ ४ = १२ किंमत : ३ ₹
अंक : ४३

# खर्डा किल्ला परिसरात वृक्षारोपण

खर्डा/वार्ताहर



जामखेड तालुक्यातील खर्डा येथील किल्ला परिसरात खर्डा इंग्लिश स्कूल, ज्युनिअर कॉलेज, छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय आणि गजानन महाविद्यालय संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी किल्ला परिसरात करंज, कडुलिंब, गुलमोहर, बाभूळ आदी विविध प्रकारच्या जातीची वृक्षारोपे लावण्यात आली. या वृक्षारोपणाचा शुभारंभ सरपंच संजय गोपाळघरे, भाजप तालुकाध्यक्ष रवी सुरवसे, संतोष थोरात, भागवत सुरवसे, महालिंग कोरे, रतीलाल डोके, संतोष लष्करे, उपप्राचार्य सुभाष फाळके, रमेश पाटील, मारुती धुमाळ, जुबेर बागवान, चंद्रकांत पोकळे, दशरथ धनलगडे, डॉ. ओंकार खिस्ते, धनंजय जवळेकर यांनी केला.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
अंक १९४ । वर्ष ४४ वे । शनिवार, ३ ऑगस्ट २०१९ । पाने १४

# भुईकोट किल्ला परिसरात वृक्षारोपण

**खर्डा (वार्ताहर)** – शिर्डी-हैदराबाद राज्य महामार्गवरील भुईकोट किल्ला परिसरात रयत शिक्षण संस्थेचे इंग्लिश स्कूल कनिष्ठ महाविद्यालय, श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व श्री गजानन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उपक्रमांत सहभाग नोंदवत वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी सरपंच संजय गोपाळघरे, पंचायत समिती सदस्य रवी सुरवसे, ग्रामपंचायत सदस्य संतोष थोरात, महालिंग कोरे, रतिलाल डोके, प्रशांत कांबळे, फिरोज मापाडी, अनिल धोत्रे, दत्तराज पवार, प्रकाश वायभासे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संतोष लष्करे, प्राचार्य प्रा. सुभाष फाळके, पर्यवेक्षक प्रा. रमेश पाटील, प्रा. मारुती धमाळ, प्रा. जुबेर बागवान, प्रा. चंद्रकांत पोकळे, प्रा. दशरथ धनलगडे, प्रा. ओंकार खिस्ते, प्रा. धनंजय जवळेकर, प्रा. संजय होळंबे, प्रा. श्रीकांत तनपुरे आदी विद्यार्थी सहभागी झाले होते.

सार्वमत

कोल्हापूर । अकोला । गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित । आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ४७००१/१९८८ । वर्ष : ३२ अंक : ३४८ www.facebo

लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे : १०+४ = १४, किंमत: ₹ ४.००

अहमदनगर, सोमवार, दि. ५ ऑगस्ट २०१९

## खर्डा येथे वृक्षारोपण

खर्डा : खर्डा (ता. जामखेड) येथील भूईकोट किल्ला परिसरात खर्डा इंग्लिश स्कूल कनिष्ठ महाविद्यालय, छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय, गजानन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. यावेळी सरपंच संजय गोपाळघरे, पंचायत समिती सदस्य रवी सुरवसे, ग्रा. पं. सदस्य संतोष थोरात, महालिंग कोरे, रतीलाल डोके, प्रशांत कांबळे, फिरोज मापाडी, अनिल धोत्रे, दत्तराज पवार, प्रकाश वायभासे, संतोष लष्करे, प्राचार्य प्रा. सुभाष फाळके, पर्यवेक्षक प्रा. रमेश पाटील, प्रा. मारुती ढमाळ आदी उपस्थित होते.

झुंजार नेता
, महाराष्ट्र ■ मंगळवार दि.८ ऑक्टोंबर २०१९ ■ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/RNP/ Be

# श्री संत गजानन महाविद्यालयात गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन

खर्डा, दि.७ (प्रतिनिधी):- गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव व श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा यांच्या संयुक्त विद्यमाने म.गांधीजींच्या १५० व्या जयंती निमित्त गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन करण्यात आले. म.गांधीजींच्या १५० व्या जयंतीनिमित्त श्री संत गजानन महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. इतिहास संकलन समिती देवगिरी प्रांतचे अध्यक्ष डॉ.राधाकृष्ण जोशी यांचे 'स्वातंत्र्यसंग्रामातील गांधीजींचे योगदान' या विषयावर व्याख्यान झाले. तसेच महाविद्यालयात गांधी विचार दर्शन नावाने म.गांधीजींच्या जिवन चरित्रावर प्रकाश टाकणाऱ्या ग्रंथाचे ग्रंथ प्रदर्शन करण्यात आले. गांधी विचारांचा प्रसार-प्रचार व्हावा याकरिता म.गांधीजींच्या 'माझे सत्याचे प्रयोग' या ग्रंथाचे वितरणही विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांच्या हस्ते करण्यात आले. म.गांधीजींच्या १५० व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात वर्षभर विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

झुंजार नेता
, महाराष्ट्र ■ शुक्रवार दि.९ ऑगस्ट २०१९ ■ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Be

# श्री संत गजानन महाविद्यालयात बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला संपन्न

खर्डा ,दि.८(प्रतिनिधी):- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळ व श्री. छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालयाच्या वतीने बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या व्याश्यानमालेचे पहिले पुष्प श्रीमती स्वाती चौधरी यांनी गुंफले. या व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी भूषविले. सावित्रीबाई फुलेच्या ऐतिहासीक कार्याचा आढावा त्यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून उपस्थित विद्यार्थ्यासमोर सादर केला. स्त्री शिक्षणाची आद्य प्रणेता म्हणून त्यांनी सावित्री बाई फुलेचा गौरव केला. स्त्री शिक्षणासाठी संघर्ष करून स्त्रीयांच्या आयुष्यात ज्ञानज्योत लावण्याचे कार्य सावित्रीबाईनी केले. आज स्त्रिया उपभोगात असलेल्या स्वातंत्र्यासाठी सावित्रीबाईनी फुलेनी अहोरात्र कष्ट घेतले असे मनोगत त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यासमोर केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी या व्याख्यानमालेचे प्रयोजन स्पष्ट करत सावित्रीबाईचे विचार व कार्याची आजही समाजाला तितकीच गरज आहे. कारण स्त्री विमोचनाच्या चळवळीला गती देण्यासाठी सावित्रीबाई फुलेचे विचार व कार्य पारदर्शक ठरते असे प्रतीपादन केले. या कार्यक्रमासाठी छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मण घोडके यांची उपस्थिती होती. या उपक्रमांचे संस्थेचे सचिव डॉ. महेश गालेकर यांनी कौतूक केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. श्रीकांत तनपुरे यांनी तर आभार प्रदर्शन श्री. माऊली लोहकरे यांनी केले.

# पार्श्वभूमी

गंमत भंडारी

दिनांक २० ऑगस्ट २०१९ मंगळवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.no.


## श्री.संत गजानन महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

बीड दि.१९(प्रतिनिधी):-स्वातंत्र्य दिन निमित्त खर्डा येथील श्री.संत गजानन महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. स्थानिक नियमाक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश गोलेकर यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, भूगोल, इतिहास योगा आदि विषयांवर तयार केलेले भित्ति पत्रके प्रकाशित करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाच्या औचित्यावर विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्याचे उद्घाटन डॉ.विवेक दिंडोरे यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ.एम एन गोलेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एन.गुळवे, विद्यार्थी, प्राध्यापक आणि सर्व कर्मचारी उपस्थित होते.

सायं. दैनिक बीड

# रिपोर्टर

संपादक : शेख तय्यब R.N.I.No.59885-93 R.No.L/13/STS/BEED/2018-20

वर्ष २७ वे अंक ७८ ■ रविवार, दि.३ नोव्हेंबर २०१९ ■ पोस्टल दि.४ नोव्हेंबर २०१९ ■ पाने

## श्री.संत गजानन महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी प्रा.डॉ.शिवानंद जाधव यांची निवड

बीड (रिपोर्टर):- श्री.छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री.संत गजानन महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी महाविद्यालयाचे भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ. शिवानंद तानाजीराव जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. संस्थेकडून त्यांना नुकतेच नियुक्तीपत्रं देण्यात आले. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष श्री.विजयसिंह गोलेकर यांनी प्रा. डॉ.शिवानंद तानाजीराव जाधव यांचे अभिनंदन करुन डॉ. जाधव हे महाविद्यालयाच्या शैक्षणीक विकास करण्यात निश्चीत यशस्वी होतील विश्वास व्यक्त केला.प्रा.डॉ.शिवानंद तानाजीराव जाधव हे यापुर्वी महाविद्यालयाचे उपप्राचार्य म्हणून कार्यरत होते. अगदी अल्प कालावधीत त्यांनी संस्थेचा विश्वास संपादन करुन ते महाविद्यालयाचे उपप्राचार्य विकासाच्या दृष्टीने कृतीशिल राहिले. यामुळे संस्थेने त्यांच्यावर ही जबाबदारी दिली असल्याचे श्री.छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्थानिक नियाम मंडळाचे उपाध्यक्ष प्रकाश गोलेकर यांनी सांगितले.

जामखेड तालुक्यातील शैक्षणीक क्षेत्रात त्यांचे अभिनंदन होत असल्याचे दिसून आले. तसेच संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

लोकमत अहमदनगर, सोमवार, दि. ९ डिसेंबर २०१९ २



राष्ट्रीय छात्र सेना (आर्मी) व १७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ऐतिहासिक भूईकोट किल्ला खर्डा येथे स्वच्छता अभियान राबविले.

# छात्र सैनिकांकडून खर्डा किल्ला परिसरात स्वच्छता अभियान

## रॅलीचे आयोजन : अभियानाचे ग्रामस्थांकडून स्वागत

लोकमत न्यूज नेटवर्क

**खर्डा :** येथील ऐतिहासिक भूईकोट किल्ला खर्डा येथे राष्ट्रीय छात्र सेना, १७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी स्वच्छता अभियान उत्साहात राबवले.

जामखेड महाविद्यालय, ल.ना.होशीग विद्यालय, श्री नागेश विद्यालयाच्या एनसीसी विभागाच्यावतीने एनसीसी ऑफिसर गौतम केळकर, अनिल देडे, मयूर भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातून भव्य स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आली.

यावेळी खर्डा इंग्लिश स्कूलचे प्राचार्य सुभाष फाळ्के, पर्यवेक्षक रमेश पाटील यांनी या रॅलीचे स्वागत केले. खर्डा शहरांमधून स्वच्छता रॅलीचे स्वागत गावकऱ्यांनी केले. या कार्यक्रमासाठी हरिभाऊ बेलेकर, प्राचार्य नवनाथ बोडखे, ल.ना. होशिंगचे प्राचार्य श्रीकांत होशिंग, उपमुख्याध्यापक दादाहरी ठाकरे, श्रीधर जगदाळे, जामखेड महाविद्यालयाचे प्राचार्य अविनाश फलके, प्रा.मधुकर आबा राळेभात, गुलाबराव जांभळे, डॉ.सुरेश भोरे, राहुल पवार, किशोर गायवळ व ग्रामस्थ उपस्थित होते.

खर्डा किल्ल्याच्या इतिहासाची माहिती किशोर गायवळ यांनी विषद केली. डॉ. सुरेश भोरे यांनी अल्पोपहाराची सोय केली. राहुल पवार यांनी या उपक्रमाचे स्वागत केले. एनसीसी चे कमांडिंग ऑफिसर जीवन झेंडे, सुभेदार मेजर व्यंकटेशन यांनी या स्वच्छता अभियानाचे विशेष कौतुक केले.

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : १०+४+४ = १८, किंमत: ₹ ४.००
अहमदनगर, मंगळवार, दि. १७ डिसेंबर २०१९

# खर्डा महाविद्यालयात चर्चासत्राचे आयोजन

खर्डा : खर्डा (ता. जामखेड) येथे आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त संत गजानन महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या वतीने दिव्यांगाविषयक एक दिवशीय चर्चासत्राचे आयोजन केले होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवानंद जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या संचालिका चंदाताई गोलेकर, डॉ. बिपिनचंद्र लाड, प्राथमिक आरोग्य केंद्राचे संतोष रणशिंग आदी उपस्थित होते. डॉ. लाड यांनी यावेळी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. ओंकार खिस्ते यांनी, सूत्रसंचालन प्रा. राजू म्हेत्रे यांनी केले. माउली लोहकरे यांनी आभार

प्रभात | अहमदनगर | शुक्रवार, दि. २० डिसेंबर २०१९

गुड मॉर्निंग



## गजानन महाविद्यालयात चर्चासत्र उत्साहात

**खर्डा, दि. १९ -** जामखेड तालुक्यातील खर्डा येथे श्री संत गजानन महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे जागतिक दिव्यांग दिनानिमित्त एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ. बिपीनचंद्र लाड व प्राथमिक आरोग्य केंद्रातील रणसिंग यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. डॉ. एस. टी. जाधव होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या संचालिका चंदाताई गोलेकर उपस्थित होत्या. सूत्रसंचालन प्रा. राजू म्हेत्रे यांनी केले. प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. ओंकार खिस्ते यांनी केले, तर आभार माउली लोहकरे याने मानले.

बीडचा
# लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
३३२ ■ मंगळवार, दि.२४ डिसेंबर २०१९ ■ Reg.No.L/Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHMAR/2010/3

## आत्मविश्वास निर्माण करणारी पाठशाळा म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना–नाईकवाडे

खर्डा । वार्ताहर

श्री छत्रपती शिक्षर व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय घ छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी शिबिराचा प्रारंभ लोणी ता. जामखेड या गावी झाला. या शिबिराचे उद्घाटन जामखेड तालुक्याचे तहसीलदार विशल नाईकवाडे यांच्या हस्ते झाले, तर प्रमुख पाहुणे म्हणून खर्डा इंग्लिश स्कुलचे प्राचार्य सुभाष फाळके यांची उपस्थिती होती. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष विजयसिंह गोलेकर हे होते. मा. तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी आपल्या उद्घाटनपर मनोगतातून व्यक्तिमत्व विकासाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून कशी चालना मिळते व सरकारच्या कल्याणकारी योजना जनतेपर्यंत कशा या माध्यमातून पोहचतात याचे विवेचन केले. ग्रामीण परिस्थितीचा बाऊ न करता अखंड कष्टातून यशाचा मार्ग तयार करण्याचे आवाहन उपस्थित शिबिरार्थी विद्यार्थ्यांना केले. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांनी सेवेतून राष्ट्र निर्माण करण्याची परंपरा विद्यार्थ्यांनी पुढे चालवण्याचे आवाहन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालय दरवर्षी राबवित असलेल्या उपक्रमांची माहितीही उपस्थिती ग्रामस्थांना संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी दिली आहे. या शिबिराच्या माध्यमातून पाणलोट क्षेत्र, विकास, वृक्षारोपन, आरोग्य तपासणी शिबीर, ग्रामस्वच्छता, सांडपाणी व्यवस्था इ. उपक्रम महाविद्यालय या गावी राबवणार आहे.

याप्रसंगी लोणी गावचे सरपंच सिद्धेश्वर शेंडकर शिबिरार्थीना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. या शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. भारत मेंगडे व प्रा. मोहसिन शेख यांनी विशेष परिश्रम गेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. श्रीकांत तनपुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. मोहसिन शेख यांनी मानले.

टि.सी.हरवला आहे
प्रशांत एकनाथ विशे या नावाचा डिप्लोमा इन इंडस्ट्रीयल इलेक्ट्रानिक्स पासचा टि.सी.शिरूर ते पुणे याप्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील क्रमकांवार संपर्क साधावा.
संपर्क
मो.८००३३९८२३३

# लोकाशा

संपादक – विजयराज बंब    majhalokasha@gmail.com    ☎ 02442- 220000

बीड, नांदेड
लातूर, आवृत्ती

• अंक २५८ •    मंगळवार, दि.२४ डिसेंबर २०१९    • No-L/18/RNP/06/Beed/2013-1


## आत्मविश्वास निर्माण करणारी पाठशाळा म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना - तहसिलदार नाईकवाडे

खर्डा, दि.२३ (लोकाशा न्युज):-श्री छत्रपती शिक्षर व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री रुंत गजानन महाविद्यालय व छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी शिबिराचा प्रारंभ लोणी ता. जामखेड या गावी झाला. या शिबिराचे उद्घाटन जामखेड तालुयाचे तहसीलदार विशल नाईकवाडे यांच्या हस्ते झाले, तर प्रमुख पाहुणे म्हणून खर्डा इंग्लिश स्कुलचे प्राचार्य सुभाष फाळके यांची उपस्थिती होती. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान महाविद्यालय विकास सनितीचे अध्यक्ष विजयसिंह गोलेकर े होते. मा. तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी आपल्या उद्घाटनपर मनोगतातून व्यक्तिमत्व विकासाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून कशी चालना मिळते व सरकारच्या कल्याणकारी योजना जनतेपर्यंत कशा या माध्यमातून पोहचतात याचे विवेचन केले. ग्रामीण परिस्थितीचा बाऊ न करता अखंड कष्टातून यशाचा मार्ग तयार करण्याचे आवाहन उपस्थित शिबिरार्थी विद्यार्थ्यांना केले. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांनी सेवेतून राष्ट्र निर्माण करण्याची परंपरा विद्यार्थ्यांनी पुढे चालवण्याचे आवाहन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालय दरवर्षी राबवित असलेल्या उपक्रमांची माहितीही उपस्थिती ग्रामस्थांना संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी दिली आहे. या शिबिराच्या माद्यमातून पाणलोट क्षेत्र, विकास, वृक्षारोपन, आरोग्य तपासणी शिबीर, ग्रामस्वच्छता, सांडपाणी व्यवस्था इ. उपक्रम महाविद्यालय या गावी राबवणार आहे.

याप्रसंगी लोणी गावचे सरपंच सिद्धेश्वर शेंडकर शिबिरार्थींना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. या शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. भारत मेंगडे व प्रा. मोहसिन शेख यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. श्रीकांत तनपुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. मोहसिन शेख यांनी मानले.

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : १०+४ = १४, किंमत: ₹ ४.००
अहमदनगर, सोमवार, दि. ३० डिसेंबर २०१९

# एनएसएस आत्मविश्वास निर्माण करणारी पाठशाळा

## विशाल नाईकवाडे : लोणीत राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**खर्डा :** आत्मविश्वास निर्माण करणारी पाठशाळा म्हणजेच राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) होय, असे प्रतिपादन तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले.

येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय व छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी अधिवेशनाचा प्रारंभ लोणी (ता. जामखेड) येथे झाला. यावेळी नाईकवाडे बोलत होते. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष विजयसिंह गोलेकर अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य सुभाष फाळके प्रमुख पाहुणे होते. नाईकवाडे यांनी व्यक्तिमत्व विकासाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून कशी चालना मिळते, सरकारच्या कल्याणकारी योजना जनतेपर्यंत या शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचतात याबाबतचे विवेचन केले. गोलेकर यांनी सेवेतून राष्ट्र निर्माण करण्याची परंपरा विद्यार्थ्यांनी पुढे चालविण्याचे आवाहन केले. विकास योजना, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिर, ग्रामस्वच्छता, सांडपाणी व्यवस्था आदी उपक्रम या गावात राबवले जाणार असल्याची माहिती संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी सांगितले.

यावेळी लोणी गावचे सरपंच सिद्धेश्वर शेंडकर, कार्यक्रम अधिकारी डॉ. भारत मेंगडे, प्रा. मोहसीन शेख यांच्यासह शिबिरार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीकांत तनपुरे यांनी केले.